# मिरा भाईंदर महानगरपालिका
## विशेष स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष स्थायी समिती सभा सोमवार दिनांक ०४/०५/२००९ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. ०२/०५/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ७) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| ८) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| ९) | श्रीम. ग्रिटा फॅरो | -- | सदस्या |
| १०) | श्रीम. हेलन गोविंद जॉर्जी | -- | सदस्या |
| ११) | श्री. याकुब ई. कुरेशी | -- | सदस्य |
| १२) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| १३) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| १४) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| १५) | श्री. सिंह श्रीप्रकाश जिलेदार | -- | सदस्य |
| १६) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. अशोक बागेश्वर | -- | उपायुक्त (मु.) |
| २) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| ३) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ४) | श्री. उत्तरेश्वर लोंढे | -- | सहा. संचालक नगररचना |
| ५) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ६) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ७) | श्री. राजेंद्र मारकड | -- | सहा. नगररचनाकार |
| ८) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| ९) | श्री. सुनिल यादव | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| १०) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| ११) | श्री. संजय गोखले | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| १२) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १३) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १४) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |
| १५) | श्री. किरणे राठोड | -- | उप अभियंता, अतिक्रमण विभाग |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| २) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| ३) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ५) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ६) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| ७) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ८) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| ९) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| १०) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| ११) | श्री. स्वप्नील सावंत | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १२) | श्री. सोनारे | -- | प्रशासन अधिकारी, शिक्षण |
| १३) | श्री हेमंत पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| १४) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वन |
| १५) | श्री. डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १६) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| १७) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| १८) | श्री. हंसराज मेश्राम | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| १९) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| २०) | श्री. नागेश इरकर | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| २१) | श्रीम. सिमा मिश्रा | -- | सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग |
| २२) | श्रीम. चारुशिला खरपडे | -- | आस्थापना विभाग |

**मा.सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा सोमवार दि. ०४/०५/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात विशेष स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. ०२/०५/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १, शहरातील पावसाळ्यापूर्वी नालेसफाई कामी लागणारी मशिनरी भाड्याने घेणे व मजूर, डंपर उपलब्ध करणे इ. कामाच्या निविदांना मंजूरी बाबत. प्रकरण क्र. १अ, महापालिका क्षेत्रातील कच्चे पक्के नाले सफाई / खोदाई, गाळ उपसणे कामी जे.सी.बी., पोकलन, बोटीसह मशिन भाड्याने घेणे कामाच्या निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग), प्रकरण क्र. १ब, महापालिका क्षेत्रातील कच्चे / पक्के नाले सफाई कामी ठेका पद्धतीने मजुर पुरवठा व माती गाळ वाहतुक करणे कामी भाड्याने डंपर पुरवठा कामाच्या निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग)) व प्रकरण क्र.१क, महापालिका क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणाऱ्या पाण्याचा उपसा (डिवॉटरींग) करणे कामी भाड्याने सक्शन मशिन घेणे व आर.सी.सी. पाईप पुरवठा करुन फिक्सींग करणे कामाच्या निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग)

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, ह्या विषयाला सुरूवात करण्या अगोदर आपल्याला एक विनंती करायची आहे. मॅक्सेस मॉलच्या ग्राउंडवर तिथे म्युनिसिपाल्टीचे ग्राउंड आहे. तिथे मागच्यावेळी मेला लागला होता. आणि ॲडव्हटाईजिंग बोर्ड लागले होते त्याबद्दल तुम्ही आश्वासन दिले होते की, मी चौकशी करून अहवाल घेतो म्हणून आता परत त्या ठिकाणी ७ दिवसाच्या त्यांनी काढला. आपल्या स्टॅंडींग ला विषय आल्याबरोबर दुसऱ्या दिवशी त्या मेल्यामधले सामान काढले. आता कालपासुन परत तिथे मेला लावलेला आहे. पुर्ण ग्राउंड त्यांनी ब्लॉक केलेले आहे. त्यांची परमिशन कोणी दिली आहे? कॉर्पोरेशनने परमिशन दिलेले आहे की, कोणी परमिशन दिलेली आहे?

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, महापालिकेने जो करार केलेला आहे त्या करारामध्ये ३० दिवस त्याला कोणत्याही वेळी वर्षातून त्याला ३० दिवस वापरायला अलाउड आहे. त्याप्रमाणे त्यांनी ॲग्रीमेंटप्रमाणे १५ दिवसासाठी त्यांनी वापरायला परवानगी मागितली त्याप्रमाणे दिलेली आहे. कारण वर्ष भरामध्ये त्याला ३० दिवस वापरायला अलाउड केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या वर्षी त्यांनी जवळ जवळ तीन महिने वापरले त्याची पेनल्टीची रक्कम आणि उर्वरित त्यांनी जो काही वापरलेल्या कालावधीने घेतलेले भाडे हे प्रभाग अधिकारी वसुल करतील नाहीतर त्यांच्या पगारातुन कट करा. तुमची परवानगी न घेता ते परवानग्या देतात. तुम्ही त्यंना फक्त ते प्ले ग्राउंड वापरायला दिलेले आहे ते

सुद्धा बेकायदेशिर आहे. त्या ॲग्रीमेंटमध्ये शेवटचा महिना असा लिहिलेला आहे तुम्ही जे म्हणता १२ महिन्यापैकी १ महिना.

**मा. आयुक्त :-**

कोणते ते दिवस त्यांनी ठरवायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे. ठरवले. मला आता सांगा नवरात्री नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी परत आता मेला लागलेला आहे. तर मग ह्यांना कायमच १२ महिन्याचे द्याना. हा वादच इकडे राहणार नाही. तुम्ही त्या जागेचे भाडे घेता.

**मा. आयुक्त :-**

मुद्दा सोडून बोलून काय उपयोग?

**मिलन म्हात्रे :-**

मुद्दा सोडून नाही.

**मा. आयुक्त :-**

वर्ष चालू झाल्यानंतर कुठले ३० दिवस घ्यायचे त्याला अधिकार ठेवलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याला अधिकार नाही. गेल्या वर्षी त्याने जास्तीचे वापरले त्याचे बोला ना.

**मा. आयुक्त :-**

गेल्या वर्षी किती वापरले हे मी माहिती काढून तुम्हाला देतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही माहिती काय काढली. मागच्या वेळेला तुम्ही हा जो विषय मांडला. मग, तुम्ही मागची माहिती काय काढली? तुम्ही आम्हाला अपडेट माहिती दिली पाहिजे की, गेल्यावर्षी त्यांचा ३० दिवसाचा कालावधी होता. त्यांनी ३५ दिवस वापरले ५ दिवसाचे पैसे पण घेतले. आणि त्याला फक्त ग्राउंड वापरायला दिले. ॲडव्हटाईजमेंट करायला नाही. ॲडव्हटाईजमेंट हा तुम्ही करायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, हा विषय येणार आहे हे आम्हाला माहिती आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला माहिती नाही. तुम्ही सभेला कमिटमेंट केलेले आहे. एवढ मला माहिती आहे. नेक्स्ट सभेला तुमची कमिटमेंट रेडी पाहिजे. एवढ आम्हाला माहिती आहे. कमिटमेंट करत रहाल वर्षभर कमिटमेंटच चालतात. कारवाई काही नाही. मागचे दोन कमिशनर असेच करत गेले.

**मा. आयुक्त :-**

मागच्या वर्षी सप्टेंबर पासुन ऑक्टोबर पर्यंत २७ दिवस वापरले होते.

**मिलन म्हात्रे :-**

पुढे नवरात्री नंतर त्यांच्या परवानग्या त्यांच्या माहितीवर जावू नका. आणि तुम्ही जे म्हणता. त्यांचे ॲग्रीमेंट ऑलरेडी ठरावानुसार फॉरफिट केलेले आहे. त्याचे काय ते बोला. स्थायी समितीच्या सभेला ठराव झाला. त्याला स्थगिती दिले. राज्य शासनाने दिले. आयुक्तांनी दिले. आमचा लास्टचा ठराव इन फोर्स मध्ये आहे मग ते ॲग्रीमेंट चालू कसे काय? ज्या ॲग्रीमेंट नुसार ज्या ठरावानुसार जे ॲग्रीमेंट झाले तो ठराव याच सभेने रद्द केला आहे. म्हणजे तो रद्द केलला ठराव योग्य आहे का की, नंतर झालेला ठराव योग्य आहे. त्याच्यानंतर मा. महासभेत सुद्धा कोणी पाठवलेला नाही. तुम्ही मा. महासभेमध्ये पाठवा. मला माहित आहे की, स्टिवन मेंन्डोन्सा यांच्या अध्यक्षतेखाली तुमचा जो काही ठराव पास झाला त्याला मॉरस रॉड्रीक्स साहेबांच्या अध्यक्षतेखाली स्थगिती देण्यात आली. तो ठराव रद्द झाला. आणि नंतरच्या ठराव इन फोर्समध्ये आहे. मग त्या ठरावाचे काय ह्याचे पहिले बोला मग आपण कालावधी बघू. सांगा तो ठराव बेकायदेशिर आहे.

**मा. आयुक्त :-**

एकदा मा. स्थायी समितीने, मा. महासभेने मंजुरी दिली.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेने त्याला मंजुरी दिलेली नाही. मा. महासभेने फक्त कमिटी अपॉइंट केली. त्या विषयाबद्दल तुम्ही फक्त माहिती द्या आणि मग बोला. अधिका-यांच्या वरती बोलू नका. मा. महासभेने कमिटी अपॉइंट केलेली आहे. त्याच्यात सुद्धा खाडाखोड झालेली आहे. जे पदाधिकारी, ज्या व्यक्तींना त्याच्यावर अपॉईंट करायचे होते. त्याची नावे गाळली गेली. त्या ठरावात खाडाखोड केली. खाडाखोड केलेल्या व्यक्तींच्या सह्या सुद्धा नाहीत. हे सचिव बाजुला बसलेत त्यांचे पत्र आहे मला म्हणजे कुठलीही मालमत्ता चार व्यक्ती ठराविक व्यक्ती ठरवणार कुठे जायच्या त्या कुठलीही मालमत्ता कोणीही कधीही कशीही द्यायची त्यांच्याकडून कमिटमेंट करून घ्या ना. तुम्ही मा. महासभेचे उदाहरण दिले.

**मा. आयुक्त :-**

आता विषय नाही तरी पण मी तुम्हाला समजावून सांगतो. परंतु, तुम्हाला जे गृहीत धरायचे ते पुढच्या वेळेला आम्ही सविस्तर आणू ऑन पेपरवर.

**अनिल सावंत :-**

हरकत नाही. साहेब, ऑक्टोबर पर्यंत २७ दिवस झाले.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही विषय मोजूच नका. ठराव रद्द केला आहे. त्याचे बोला. आपण विषय कशाला मोजायचे ठराव रद्द झाला आहे. प्रभाग अधिकाऱ्यांना आयुक्तांचे पत्र आहे का ठरावानुसार वागू नका किंवा ठरावाचे पालन करायचे नाही की हा ठराव पुर्वीचा जिवित आहे. नंतरचा बोगस आहे. किंवा काय आहे स्थगिती मिळाल्याचे तुम्हाला पत्र आहे का? तुम्ही परवानग्या का देतात? तुम्ही आयुक्तांना पत्र व्यवहार केला का की, हा ठराव असा असा पास झाला आहे. यावर कारवाई काय करायची.

**मा. आयुक्त :-**

मी त्या विषयाशी संलग्न बोलत नाही. मा. महासभेने एकदा मंजुरी दिली.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेने त्याला मंजुरी दिलेली नाही. ठराव निट वाचा मग बोला.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेची मंजुरी मिळाल्यानंतर स्थायी समितीने मंजुर केल्यानंतर ॲग्रीमेंट जर झाले. तर पुन्हा स्थायी समिती हे कॅन्सल करू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

कसे का नाही करू शकत? आम्हाला तसे उत्तर द्या. ठराव आमचा तुम्ही दिड वर्षे घालवले कशाला?

**मा. आयुक्त :-**

मी त्या विषयाशी निगडीत बोलत नाही. मी तुम्हाला एक उदा. सांगतो की, कुठल्याही मा. महासभेने मंजुरी दिली. मा. स्थायी समितीने ॲग्रीमेंट केला आता ऑक्ट्रॉयचाच विषय घ्या. मा. महासभेने प्रशासकिय मंजुरी दिली. ऑक्ट्रॉय चे टेंडर मंजुर केले मी ॲग्रीमेंट केले. उद्या तुम्ही ८-१५ दिवसांनी म्हणणार की, ॲग्रीमेंट कॅन्सल करा. असे होउ शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ते बेकायदेशिर असेल तर.

**मा. आयुक्त :-**

कोणताही कायदा झालेल्या ॲग्रीमेंट कॅन्सल करायचे असेल तर नियमाप्रमाणे जावे लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

बेकायदेशिर असेल तर...

**मा. आयुक्त :-**

लवाद नेमावा लागतो मग कॅन्सल करायची प्रोसिजर आम्हाला हे नको म्हणून एक महिन्याची नोटीस द्यावी लागते. किंवा त्यांनी नोटीस द्यावी लागते. आम्ही नोटीस द्यावी लागते. त्यांनी नुकसान भरून लवाद नेमून त्याचा डिसीजन घ्यावा लागतो.

**मिलन म्हात्रे :-**

पार्थचे असेच ॲग्रीमेंट केले ना.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही मनात आणले आणि मंजुर करा नंतर ॲग्रीमेंट बनवा. मनात आले आणि कॅन्सल केले असे होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे होत नाही. आम्ही सुद्धा त्याच मताचे आहोत.

**मा. आयुक्त :-**

ॲग्रीमेंट करण्यापुर्वी तुमचे निर्णय लागतात.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही बेकायदेशिर केले ते सरळ रद्द होते. मी तुम्हाला सांगतो ना.

**मा. आयुक्त :-**

बेकायदेशिर स्टॅंडींगने केले पहिले मंजुर करता आणि नंतर ना मंजुर करता याचा अर्थ काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

पहिल्याच्या स्टॅंडींगने विचार केला नाही. म्हणून नंतरच्या स्टॅंडींगने रद्द केले. तो आमचा अधिकार आहे.

**मा. आयुक्त :-**

नंतरच्या स्टँडींगने रद्द केले असेल तर रितसर मा. महासभेची मंजुरी घेवून स्टँडींगने असा ठराव केलेला आहे. एक महिना ठेकेदाराला द्यायचे आणि मग आम्हाला नको म्हणून सांगून मग लवाद....

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला तेच पाहिजे ना होत नाही. दिड वर्ष झाले तेच झालेले नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेपुढे विषय पाठवा.

**जुबेर इनामदार :-**

हा जो करार झालेला आहे ना तो ३० दिवसाचा आहे ना. मग ३० दिवसाची मुदत नवीन वर्षामध्ये सुरू झाली.

**मा. आयुक्त :-**

आता फक्त १५ दिवसाची मुदत घेतली नविन वर्षामध्ये आता त्यांचे १५ दिवस शिल्लक राहिले. मार्च महिना उजडेपर्यंत १५ दिवस दिल्यानंतर त्याचा संबंध संपला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण बोलला की, मा. महासभेकडे विषय पाठवा. पण तुम्ही आताच बोलला की, आपण त्याचे ॲग्रीमेंट केलेले आहे. आणि ॲग्रीमेंट आपण तसे कॅन्सल करू शकत नाही. मग मा. महासभेपुढे विषय पाठवायची गरज काय?

**मा. आयुक्त :-**

त्यांची मागणी आहे की, मा. महासभा निर्णय घेईल त्याचे म्हणणे आहे की, मा. महासभेत जर मंजुर झाले तर १ महिन्याची नोटीस देवून लवाद नेमायचा असतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सर, आपण आमची मागणी नाही ना त्यांची एकट्याची मागणी आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

आमची नाही. टाउन प्लानिंगमध्ये प्रोव्हीजन आहे प्ले ग्राउंड मध्ये तुम्ही काहीच अलाउड करू शकत नाही. मी कायद्याचे बोलतो. माझी व्यक्तीगत मागणी नाही. मुंबईच्या हायकोर्टाने निर्णय दिलेत ते मी तुम्हाला लावून पण दिलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

सभागृहाची इच्छा नसल्यास....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभागृहाची इच्छा नाही. जे ॲग्रीमेंट झाले ते योग्य झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पार्थ च्या ठरावाची यांची इच्छा तो ठराव रद्द होवून आला आणि पार्थ तयार होते. यांची इच्छा तिकडे पण नव्हती २८ लोकांनी ठराव पास केला.

**मा. आयुक्त :-**

मग ४५१ ला त्या ठरावाला.....

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, मुळ मुद्दा बाजुला राहिला. तुम्ही १५ दिवसाची परमिशन दिली ना. आता जर त्यांनी मेला लावला त्याच्यासाठी त्या मेलेवाल्यांनी महापालिकेची परवानगी घेतली का? की, तो १५ दिवसामध्ये काहीही करू शकतो. महापालिकेने त्या मेलाला परवानगी दिले का? तुमचे त्याच्यामध्ये नॉम्स कंडीशन बरोबर आहे का?

**मा. आयुक्त :-**

दिलेले आहे. आणि भाडे आम्ही घ्यायचे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मेल्याचे दुसरे असते. ते शो करतात. तुम्ही तिकडचे कसे काय घेता? त्या ब्रम्हदेवाच्या समोरच्याचे भाडे कशाला घेता? ते त्यांचे ट्रॅन्झॅक्शन झाले.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, साईन बोर्डचे ॲडव्हटाईजमेंन्टचे बोर्ड लावलेले आहे ते जरा काढून घ्या. नाहीतर त्यांनी जे लावले त्यांच्याकडून महापालिकेने उत्पन्न घ्या.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या पार्थचे रिझर्व्हेशन असेच झाले होते. २८ लोकांचा ठराव झाला होता. ह्यांना ते मान्य नव्हते शेवटी तो स्थगित झाला आणि आता ते पार्थ सुरू झाले. तो ठराव आम्हीच मंत्रालयातुन रद्द करून आणला होता.

**मा. सभापती :-**

ज्या होर्डींग्ज किंवा बॅनर लागलेले आहेत त्यांचे पूढच्या मिटींगला होर्डींग्ज चे पैसे आले की नाही? किती होर्डींग्ज लागलेले आहे ते आमचे सभासद बघून येतील आणि त्या ॲडव्हटाईजमेंटचे पैसे आले की नाही त्याच्यावर.....

**मिलन म्हात्रे :-**

आतापर्यंत लावलेले सर्व

**मा. सभापती :-**

त्या अधिका-यांवर कारवाई केली जाईल. ज्या बोर्डाचे पैसे आले नसतील त्या अधिका-यांवर कारवाई केली जाईल. त्याच मिटींगच्या दिवशी मी सर्वांना घेवून जाईल आणि ते बोर्ड मी तुम्हाला दाखवीन की, ह्या बोर्ड चे पैसे आले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आणि रस्त्याचे काय झाले? रस्ता पण सार्वजनिक आहे. त्याचे पण पुढचे काही नाही. आमच्याकडे पत्र आहे की, तो रस्ता सार्वजनिक आहे म्हणून...

**मा. सभापती :-**

विषयावर चर्चा करा. हा विषय संपला.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, गेल्यावेळी मा. महासभेमध्ये विषय आलेला की, नालेसफाई बद्दल तेव्हा आयुक्त साहेबांनी पूर्ण अहवाल दिला होता की, कुठले नालेसफाई होणार आहे. कुठल्या विभागाचे? कुठल्या एरियाचे? कुठून कुठपर्यंत? अशा पद्धतीची माहिती यावेळी आलेली नाही. कारण आपण आपल्या रेग्युलर कर्मचा-यांकडून सफाई करूनच घेतो. ब-याच नाल्यांची घेतो. असे घेता कामा नये की, तेच नाले ते ही साफ करतात आणि आपले कर्मचारीसुध्दा करुन जातात आणि त्यांनी आपल्याकडून डबल पैसे वसुल करायचे किंवा त्याचा टाईम त्यांनी तिथे घालवायचा.

**मा. आयुक्त :-**

यादी करून देवू.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, प्रशांत हॉटेल के यहा से फाटक तक आर.सी.सी. का कंपाउंड बना है। कंम्पाउंड बनाया बडावाला गटार रेल्वे के अंदर है। उसके अंदर अपनी जे.सी.बी. या कोई भी गाडी नही जा सकती।

**मा. आयुक्त :-**

तोड के जायेंगे।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

तोड के जायेंगे। लेकीन अंदर इतनी भी जगह नही है की, रेल्वे के अंदर रेल्वे वालोने जे.सी.बी. वाले पर पिछले टाईम केस किया था।

**मा. आयुक्त :-**

इस साल हमने रेल्वे वाले को लेटर लिखा है। की, साफसफाई करके लो नही तो हम तोडके साफसफाई करेंगे।

**मुन्ना सिंग :-**

वह तो अपने को ही करना होगा।

**मा. आयुक्त :-**

हमने उनको जान बुजके लेटर लिखा है की, आप साफसफाई करो। बरसात के पहले नही किया तो हमे करना पडेगा और खर्चा आपसे लेंगे। ऐसा जानबुझके लिखा है।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

पिछले साल ईस्ट मे सब वे के निछे से पानी पुरा निकाला था तो इस टाईम पानी निकालने के लिए क्या करेंगे।

**मा. आयुक्त :-**

करेंगे ना। अगर ज्यादा होगा तो सब वे से निकालेंगे।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

ज्यादा भरेगा तो नही। बारीश के पहले करना होगा।क्योंकी ईस्ट मे पानी जाने के लिए जगह नही है।

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब, गेल्या वेळेला सब वे ओपन होता आणि आता हा सब वे झालेला आहे. कम्पलिट आहे. आणि आता पाणी जावू शकत नाही.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

३ लेटर भी दिया है। और उसपर बात भी किया है। कमिशनर साहब, ईस मे पानी निकलने के लिए बिलकुल भी जगह नही है। रास्ता ही नही है। और पिछले टाईम सब वे का काम अधुरा था इसलिए तोडके पानी निकाला था। इस टाईम तो सब वे का काम पुरा हुआ है। सर, आप साथमे चलके व्हिजीट दो तभी आपको पता चलेगा। साहब आप काम कभी से चालू करेंगे।

**मा. आयुक्त :-**

चालू हो गया है। मिरा रोड से चालू हुआ है।

**अनिल सावंत :-**

मिरा रोडला कुठे चालू झाले?

**मा. आयुक्त :-**

जाफरी खाडी.

**अनिल सावंत :-**

जाफरी खाडीचे मागे सँन्क्शन घेतले होते ते झाले सुरू .....

**जुबेर इनामदार :-**

साहेब, गेल्यावर्षी एच.ओ.डी. नेमले होते नाले साफसफाईसाठी.

**मा. आयुक्त :-**

यावर्षी पण नेमले आहेत.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

साहब, मैने आपको पिछले दिन भी बताया था। अगर बारीश के पहले रास्ता नही निकाला पानी का तो स्टेशन से लेके हनुमान नगर, रावल नगर के यहा पानी भरता है। मैने लेटर भी दिया है। लकीन अभि तक उसका जवाब नही आया है। रेल्वे मे बात की है लेकीन अभि तक परमिशन नही आया है। साहब, उसपर जरा ध्यान दिजिए।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब उसपर व्हिजिट करके जो भी डिसिजन लेना है वह अभी ले लिजिए। ऐसा नही की पानी भरने के बाद डिसिजन लिया जाए।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

साहब नाला तो अभी फुल है। बारीश नही आया। जितना नाला था वह अभी फुल है।

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, गेट क्र. १ आहे शांतीनगर तिथे पोकलन नाही. तर तिथे पोकलन टाका ना. कारण जाफरी खाडी वगैरे तिथे मोठा एरिया आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यात जो तक्ता दिलेला आहे. प्रकरण क्र. १ (अ) यामध्ये शेवटला साहेबांची सही आहे. गट क्र. १,२,३,४ यामध्ये १५९.३३ रेट दिलेला आहे. एका मजुराचा आणि डंपरचा रेट आहे ९०० रू. गट क्र. ५ मध्ये मजुराचा रेट १५९.३२ आणि डंपरचा रेट डायरेक्ट ८० रू. ने वाढला प्रति दिन. त्याच्या खाली पटकन मजुरामध्ये ७ रू. वाढले. इकडे ५९ आहे खाली ५६ आहे. रेट त्याचा परत प्रति दिन ८० रू. वाढला. परत इथे ७ रू. वाढला खाली मजुराचा ८ रू. रेट वाढलेला आहे. सगळीकडे मजुर तेच काम करतो. डम्पर पण तेच काम करतो. आता गट क्र. ८ करिता ९०० रू. आहे. गट क्र. ६ आणि ७ मध्ये डायरेक्ट ८०-८० रू. ची वाढ झाले. वरती ९०० आहे. गट क्र. १,२,३,४,५ करिता ९७९ आहे. ६ करिता ९७९ आहे. ७ करिता ९७९ आहे. परत ८ करिता ९०० रू. आहे. म्हणजे प्रतिदिन ८० रू. ची वाढ या साईडला ७ रू. ची वाढ आहे. नंतर परत मजुरांची स्ट्राईक वगैरे ही भानगड सगळी राहणार. साहेब, माझी अशी विनंती आहे की, एक रेट काहीतरी फिक्स ठेवा ९०० आहे ना तर त्याला सव्वा नवशे करा. सगळ्यांना सव्वा नउशे ने करा. नसेल तर सगळ्यांना ९०० रू. वर आणा. रेट सुद्धा मी असे नाही म्हणत की, मजुरांना रेट कमी द्या. उन्हाळा आहे लोक कामे करतात. चिखलात गळ्यापर्यंत कामे करतात. माझ्याकडे सगळी व्हिडीओ शुटींग वगैरे आहे. हे जे १५९ आहे ते तुम्ही सगळ्यांना १६२ करा. नसेल तर १५९ सगळ्यांनाच देउन टाका. इकडे कमी तिकडे जास्त अशी कॉन्ट्रव्हर्सी ठेवू नका.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, मागिल वर्षी जे.सी.बी. चा रेट होता ७५८ आता ४९५ आलेले आहे. पोकलन चे मागिल वर्षाचे रेट आहे. १४११ यावेळी ११८० आहे. बोटी सह पोकलन १४११ यावेळी १२२५ आहे. आणि मजुरांचा रेट १५९ आणि डंपरचा रेट आहे १७००. १७०० रू. पर डे असल्यामुळे आता जे आपल्याला टेंडर आलेले आहे. ते गट व्हाईज आल्यामुळे झालेले आहे. तसे करायचे असेल तर एक फिक्स रेट करून द्या. सरासरी करा.

**मिलन म्हात्रे :-**

सगळ्यांना सरासरी सारखी द्या.

**मा. आयुक्त :-**

गट व्हाईज असल्यामुळे डिफरन्स पडला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्याच्यामध्ये दुसरा मुद्दा असा आहे की, हा राळ वगैरे सगळं निघणार. त्याचा निचरा कुठे करणार? त्यांना आपण काही प्वॉईंट दिले का? कारण काय होते की ब-याचशा वेळेला राळ काढतात सुभाषचंद्रबोस मैदानाच्या इकडे आणून टाकतात.

**मा. आयुक्त :-**

यावेळेला आपण टी.डी.आर. देवून जागा ताब्यात घेतली ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचा ह्याच्यात इकडे कुठे ही उल्लेख नाही. गट क्र. ५ अमुख ठिकाणी.....

**मा. आयुक्त :-**

आपण जी टी.डी.आर. ची जागा घेतलेली आहे. त्या जागेत टाकायचे प्वॉइंट जवळ जवळ कुठले तसे त्यांना आदेश देवू या.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यात त्यांची लिस्ट नाही.

**मा. आयुक्त :-**

ऑर्डर देतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

मग रेट काय फिक्स केला? कारण आज फायनल करून टाका.

**मा. आयुक्त :-**

सरासरी काढायला लागेल ना.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, नालेसफाईकामी उपलब्ध करण्यात येणारे मजूर व डंम्पर त्याचा तुम्ही जो तक्ता दिलेला आहे. त्याच्यामध्ये जनतानगरमध्ये ५ वॉर्ड आहे आणि तिथे ६५ कर्मचारी आणि ६ गटारावर तिथे ९ वॉर्ड आहे तिथे फक्त ७० कर्मचारी.

**मिलन म्हात्रे :-**

कसे काय? कारण तिथे ८ वॉर्ड आहेत. आमच्याकडे स्लम जास्त आहे. खाडी आहे.

**जुबेर इनामदार :-**

तिथे कमी करा असे मी बोलत नाही. क्षेत्र मोठा झाला.

**मिलन म्हात्रे :-**

क्षेत्र नाही. त्याच्या आतून सगळं उचलायला लागते.

**मा. आयुक्त :-**

तिथे झोपडपट्टीत डोक्यावरुन आणायला लागते. आणि पोकलनने आणि जे.सी.बी. ने ट्रकमध्ये डायरेक्ट टाकायचे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, तुम्हाला इथे तक्ता नालेसफाईबद्दल मागवला होता. तर आता कांबळे साहेबांनी मला दिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्यात आपण रेअ वाढवून घेतो. जस जसे लागतील तस तसे रेट वाढवू ना.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आम्हाला ही जी नालेसफाईबद्दल माहिती दिलेली आहे. ह्याच्यामध्ये तेच नाले रोज साफ होतात. त्याची माहिती ......

मा. आयुक्त :-

रोज सफाई होणारे नाले कट करा.

**जुबेर इनामदार :-**

रोज साफसफाई आरोग्याचे कर्मचारी करतात. त्यांना तिथे कशाला घालवता. सर, आपले म्हणणे असे आहे की, कुठे तरी पैसे वाचवून काम व्यवस्थित झाले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

दररोज जी नाले सफाई होतात. ते कट करा. आणि त्याच्या व्यतिरिक्त जे गटार साफसफाई होतात ते तळापर्यंत गेले की नाही ते आम्हाला पण दाखवा.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, गट नं. ७ बघा. त्याच्यामध्ये १० वॉर्ड आहेत. त्याच्यामध्ये ३ मार्केट येतात. आणि ते सिल्वर पार्क पासून पूर्ण जातात. शांतीनगर, विजय पार्क, सिल्व्हर पार्क वगैरे पूर्ण एरिया येतो. ती त्याच्यामध्ये माहिती नाही. तिथे जरा कामगार वाढवा. कारण सत्तरच कामगार ठेवलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

वाढवू ना.

**अनिल सावंत :-**

तिथे ८० करा.

**मिलन म्हात्रे :-**

झोन क्र. ३ ला गेल्या वेळेला किती माणसे होती? आणि डम्पर किती होते?

**संदिप शिंदे :-**

तिथे एक डम्पर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एवढा मोठा नाला तो आणि तुम्ही एका डम्परने काय करता?

**मदन उदितनारायण सिंह :-**

कमिशनर साहेब, खारीगाँवको लगके जितने भी नाले है। कोलीनगर, किरणनगर, नवघर गॉव मे उसमे पोकलन मशिन अभी से लगाये लाये। बारीश आनेका इन्तजार नही किया जाए।

**मा. आयुक्त :-**

शुरु किया है ना।

**मदन उदितनारायण सिंह :-**

कहॉ पर शुरु किया है। मिरारोड मे शुरु किया है। यहॉ पर शुरु नही किया है। क्योंकी बारीश आने के बाद मे उसे बादमे जाने को जगह नही मिलेगा। इसलीए यहॉ पर पहलेसे ही शुरु किया जाए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषयासंदर्भात मा. आयुक्त सो., यांचेकडील गोषवारा वाचन करण्यात आला.

महानगरपालिकेने शहरातील पावसाळी नाले सफाई खोदाई करणेकामी जे.सी.बी. मशीन, पोकलन मशिन, बोटसह पोकलन मशिन भाड्याने घेणे, मजुर व डपंर पुरवठा करणे, सक्शन पंप भाड्याने घणे, आर.सी.सी पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे आदी कामाच्या जाहिर निविदा सुचना दि. ६/४/२००९ रोजी दै. सामना, दै. नवशक्ती, दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदाकाराने निविदा दर सादर केले आहेत. त्यापैकी खालील सर्वात कमी दराच्या निविदा आहेत.

**<u>अ) जे.सी.बी. मशीन, पोकलन मशिन, बोटसह पोकलन मशिन भाड्याने घेणे.</u>**

नाले सफाई कामी जे.सी.बी. मशिन, पोकलन मशिन, बोटीसह पोकलन मशिन पुरवठा कामी **गट क्र. ०१ ते ०८ करीता मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी जे.सी.बी. मशिन रु. ४९५/- प्रती तास, पोकलन मशिन रु. १,१८०/- प्रती तास, बोटीसह पोकलन मशिन रु. १,२२५/- प्रती तास हे दर इतर निविदाकाराच्या तुलने सर्वात कमी आहेत.

**<u>ब) मजुर व डंपर पुरवठा करणे</u>**

कच्चे नाले, पक्के नाल्यातील गाळ काढणे व निघालेला गाळ, माती, कचरा वाहतुक करणे कामी कंत्राटपध्दतीने मजूर व भाड्याने डंपर पुरवठा करणे कामी **गट क्र. ०१, ०२, ०३, ०४** करीता **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५९.३३ व **मे. जय श्री कृष्णा ट्रान्सपोर्ट** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९००/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०५** करीता **मे. संकल्प ट्रेडींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५९.३२ व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०६** करीता **मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५६/- व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०७** करीता **मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५६/- व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०८** करीता **मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५७/- व **मे. जय श्री कृष्णा ट्रान्सपोर्ट** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९००/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

## क) सक्शन पंप भाड्याने घेणे व आर.सी.सी. पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे.

**सक्शन पंप भाड्याने घेणे :-**

शहरात सखल भागात पावसाळी पाणी तुंबून राहु नये म्हणुन पाण्याचा उपसा वेळीच करण्याच्या दृष्टीने (डिवॉटरींग) करणेसाठी पेट्रोल, डिझेल, इंधनावर चालणारे विविध क्षमतेचे आवश्यकतेनुसार सक्शन मशिन ऑपरेटरसह भाड्याने पुरवठा करणे कामी **मे. मनोहर ट्रेडींग कंपनी** यांनी निविदेत सादर केलेले दर सर्वात कमी आहेत.

१) ५ हॉर्स पॉवर - रु. २७५/- प्रती तास
२) १० हॉर्स पॉवर - रु. ३३०/- प्रती तास
३) १५ हॉर्स पॉवर - रु. ३५७/- प्रती तास

**आर.सी.सी. पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे :-**

शहरात पावसाळी पाण्याचा निचरा करणे तसेच नाले खोदताना रोड क्रॉसींग ठिकाणी NP - 3, आर.सी.सी. पाईप टाकावे लागणार आहे. सदर पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे कामाच्या खालील ठेकेदाराच्या निविदा समान असून कमी दराच्या आहेत.

| क्र | निविदाकाराचे नाव | १ फुट व्यास प्रती नग | २ फुट व्यास प्रती नग | ३ फुट व्यास प्रती नग |
|---|---|---|---|---|
| १ | मे. गणेश डेव्हलपर्स | रु. २,६८०/- | रु. ६,२५५/- | रु. ११,०८२/- |
| २ | मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | रु. २,६८०/- | रु. ६,२५५/- | रु. ११,०८२/- |

शहरामध्ये पावसाळ्यात पाणी तुंबु नये, पाण्याचा निचरा व्यवस्थित होण्याच्या दृष्टीने ठिक ठिकाणी रोड क्रॉसिंगमध्ये पाईप बसविणे कामी गरजेनुसार आर.सी.सी. पाईप उपलब्ध करण्यात यावेत. शहरात कोणत्याही विभागात पावसाचे पाणी तुंबणार नाही. कोणताही भाग जलमय होणार नाही. यादृष्टीने आवश्यकती सर्व उपाययोजना करण्यात यावी.

वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या निविदा दरानुसार संबधीत ठेकेदारांची देयके अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे. ठराव वाचुन कायम करण्यात यावा व कामास त्वरीत सुरवात करावी. आवश्यकतेनुसार मजुर, डंपर, मशिनरी वाढविण्यात यावी. तसेच शक्य झाल्यास सक्शन मशिन खरेदी करावी.

**प्रकाश ठाकूर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, या ठरावामध्ये माझी अशी एक सुचना आहे की, ज्या-ज्या ठिकाणी एरिया मोठा आहे. पावासाळ्याचे दिवस आहेत. त्या त्या ठिकाणी जरुरत असेल तिथे मजूर वाढवून घ्या. साफसफाई व्यवस्थित व्हायला पाहिजे. मागच्या वर्षी आयुक्तांनी एक काम चांगले केले होते की, गेल्यावर्षी पाउस पडून सुध्दा कुठेही पाणी भरलेले नव्हते. त्यानंतर तुमचे जे जे.सी.बी. आहेत, डम्पर आहेत त्याची माहिती त्या त्या गटामधल्या नगरसेवकांना असु दे. नाही तर काय होते की, जे.सी.बी. आणि डम्पर दोन्ही खराब होतात.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक माहिती अशी द्या की, आता हा ठराव होतो. नंतर अधिकारी काय बोलतात की, ठरावामध्ये एवढी फिगर आहे त्याच्यापेक्षा आम्हाला जास्त मजूर वाढवता येत नाही. हे उत्तर सगळ्या नगरसेवकांना दिले जाते.

**मा. आयुक्त :-**

खाली एक वाक्य वाढवणार की, जस जसे लागतील तस तसे घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

असे कशाला करता. इकडे ७० लिहले आणि तुम्ही तिकडे १०० वाढवतील आणि वरती ४० चे पैसे उडवून लावतील. आता माझ्याकडे ६५ आहे ना. ६५ अधिक गरज लागल्यास १०.

अनिल सावंत :-

गरज पडेल तसे करा. तुमच्या देखरेखी खाली करा.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ठरावामध्ये टाकून घ्या. डम्पर किती आहे? काय आहे? नंतर आम्हाला उत्तर देतील की, एकच डम्पर मंजूर आहे.

**मा. आयुक्त :-**

गरजेनुसार त्या वॉर्डातले नगरसेवक आणि आयुक्त बसून वाढ करायला वाटले तर आपण वाढ करुन घेवू.

**मिलन म्हात्रे :-**

सरासरीचे फिगर.

**मा. आयुक्त :-**

ती आली ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहब, असमे हमने अलग से डम्पर और मजूर की प्रोव्हीजन कि है। अपना जो डेली का साफसफाई का है। वह मजूर उसमे नही घुमाया जाए नही तो हमेशा वही लोगोको घुमाते है।

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ७ ते ३ वाजेपर्यंत ते मजेर काम करतात. नंतर ३ ते ६ आपल्या नाल्यावर काम करतात. मॅनपॉवर त्याची जवळ जवळ १२ तास चिखल उपसायची राहिल का?

**मा. आयुक्त :-**

नाही राहणार.

**मिलन म्हात्रे :-**

तर ते गेल्या वर्षी झाले.

**मा. आयुक्त :-**

कोण करतील त्यांना ससपेन्ड करुन टाकू.

**अनिल सावंत :-**

उनका ॲडन्टीफिकेशन क्या है? उनका अलगसे ॲड्रेस दे दो।

**मा. आयुक्त :-**

ते ठेकेदाराने बघावे.

**मिलन म्हात्रे :-**

या चर्चेचे काय आहे की, आपल्याला वाटते तसे नाही. मजूर सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत थकतो. तो डोक्यावर राळ आणि चिखल घेवून काय काम करणार. त्यापेक्षा तुम्ही कुठली टीम आहे ......

**मा. आयुक्त :-**

यामध्ये तुमच्या पुढे एक दुरुस्तीचे ठेवतो बघा. १२ लाख ६७ हजार ७६९ रुपये सक्षम पंपासाठी खर्च झालेला आहे. सक्षम पंप पाणी उपसण्याकरीता. एका पंपाची किंमत सबमर्शिबल लाईटवर चालायची किंवा डिझेलवर चालायची. त्याची ३५ ते ४० हजार रुपये किंमत आहे. तर याचा टोटल काढले तर आपल्याला २२ पंप खरेदी करुन मिळतील तर आपण डिझेल निम्मे आणि इलेक्ट्रीकलचे निम्मे असे खरेदी करायचे का? ५ लाखात खरेदी झाली की कायम स्वरुपात झाली आणि ते इमारतीला वापरायला मिळेल. आपले १०० सबमर्शिबल पंप आहेत. डिझेल आणि इलेक्ट्रीकवर चालतात तर आपले १२ लाख ६७ हजार ७६९ रुपये गेल्या वर्षी आपले खर्च झालेले आहेत.

**अनिल सावंत :-**

भाड्याने किती पंप घेतले होते?

**मा. सभापती :-**

ही अमाउंट आहे.

**अनिल सावंत :-**

मला कळले. पण किती पंप घेतले?

**मा. आयुक्त :-**

२२ पंप यामध्ये येवू शकतात. ५ लाख रु. चे पंप खरेदी करु.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब माझी सुचना अशी आहे की, आपला सबमर्शिबल इलेक्ट्रीकचा आहे. पण जेव्हा पाणी पूर्ण भरते आपण २६ जुलैला बघितले. सगळीकडे लाईट १२-१२ तास नाही, ऑल ओव्हर शहरामध्ये नाही. हिरो होन्डाचे जनरेटर सेट येतात. आता तुम्ही जर सहा पंप घेतले. तर त्याच्याबरोबर तो जनरेटर संच घेतला तरच उपयोगाचे आहे ना. कारण सगळीकडे लाईट तर गेलेली असते. तुम्ही लाईट लावणाऱ्या बरोबर असता. तुम्ही सब मर्शिअल इलेक्ट्रीकचा विषय पण बोलतात.

**मा आयुक्त :-**

ज्या ठिकाणी लाईट घालवणार नाही. सगळीकडेच लाईट घालवत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणूनच सांगतो. जिकडे इलेक्ट्रीकचे घ्याल ना. त्याच्या बरोबर तो सेट असेल तरच तो कामाला येणार. समजा लाईट गेली, मला तुम्हाला लाईट द्यायची आहे. पण लाईटच नाही, काय करणार?

**मा. आयुक्त :-**

ज्या ठिकाणी लाईट नाही त्या ठिकाणी डिझेल वापरु ना.

**जुबेर इनामदार :-**

सब मर्शिअल बद्दल थोडीशी माहिती देतो. ग्रॅन्ड फोर्सचे सबमर्शिबलचे ड्रेनिंग पंप येतात. तुमचे म्हणणे बरोबर की, जिथे लाईट गेली तिथे त्याचा काहीच उपयोग नाही ना. तिथे लाईट उपलब्ध आहे तिथे अशा पध्दतीचे ड्रेनिंग पंप त्याचा आउटपुट कनेक्टींग येते. डिझेल पेक्षा ३ पटीने जास्त असतो.

**मा. आयुक्त :-**

आणि ते पाण्यात टाकूनच पंप करतात.

**जुबेर इनामदार :-**

त्याला पाण्यामध्येच टाकावे लागतात. पाण्यामध्ये सोडून दिले तर स्टोन स्वतः पिकअप करतो आणि बाहेर डिस्प्युट करतात. इतकी त्याची क्षमता आहे. ग्रॅन्ड फोर्स कंपनीचे येतात. येताना त्याच कंपनीचे उपलब्ध करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

निम्मे मिळालेले आहे आणि निम्मे त्याचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पहिले डिझेलचे खरेदी करा.

**अनिल सावंत :-**

साहेब, हे फक्त पावसामध्ये तीन महिने तरी वापरणार ना.

**मा. आयुक्त :-**

त्यानंतर राहिलेले पंप इलेक्ट्रॉनिकचे निम्मे घेतले ना तर आपल्या येथे प्रभाग समिती जिथे जिथे निर्माण झालेली आहे, दवाखाना आहे. त्या ठिकाणी आम्ही पाण्यात टाकून वर लीप करण्यासाठी वापरता येईल ना.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, म्हणजे ते मेन्टेन व्हायला पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

टोटल कितना खरेदी कर सकते है?

**मा. सभापती :-**

५ लाख रु. तक।

**मदन उदितनारायण सिंह :-**

५ लाख रु. मे कितना पंप आ जाऐगा?

**मा. सभापती :-**

१० पंप आएगा।

**मदन उदितनारायण सिंह :-**

खरेदी करेंगे तो अच्छा है।

**मा. आयुक्त :-**

१२ लाख रु. हर बरस खरेदी करनेसे .....

**मदन उदितनारायण सिंह :-**

उससे अच्छा खरेदी करना।

**जुबेर इनामदार :-**

वर्षाला १२ लाख रु. खेरेदी होतात ना. ५ लाख रु. एका वर्षामध्ये नाही चालले. तरी आपण ५ लाख रु. वाचवतो ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

खरेदी करेंगे तो अच्छी बात है।

**मा. आयुक्त :-**

दोन्ही करु. डिझेल आणि इलेक्ट्रीकल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आयुक्तांच्या पॉवरमध्ये करु शकता ना.

**मा. आयुक्त :-**

या ऐवजी, ठरावात टाका ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

भाड्याने घेण्याऐवजी खरेदी करु.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्याच्यामध्ये असे आहे की, १० घ्यायचे आहे ना. तर त्यात ३ मर्सिबल घ्या. ७ डिझेल घ्या असे करा.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. असे करु. मागच्या वर्षी २ कोटी ४ लाख रु. खर्च झालेला आहे. तर यावेळेला दिड लाख रु. खर्च करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मजूरचे आणि डम्परचे काय रेट करायचा आहे?

**मा. आयुक्त :-**

९५८/- रु. करायचा आहे. सरासरी जे रेट आहे ते एकच ठेक्यावर असेल तर करता येईल. जर वेगवेगळे असतील आणि मी करणार नाही, असे म्हटले तर काय करणार? आपले पैसे सरासरी करुन तेवढेच जाणार आहे. तर वेगवेगळ्या ठिकाणी वाहतुक लांब असेल, जवळ असेल त्यामुळे ५-१० रु. चा फरक झालेला आहे. एक ११ रु. चा फरक आहे आणि दुसरा ८ रु. चा फरक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही म्हणालात तर तुमच्याच प्रश्नाच उत्तर देतो. आता इकडे गट क्र. १, २, ३, तीन म्हणजे आमचे वॉर्ड आले. वॉर्ड क्र. १, २, ३ आता १ आणि २ ही खाडी आतमध्ये आहे. क्रांतीनगरला डोक्यावरुन सामान वहायला लागते. आता त्याचा रेट किती आहे?

**मा. आयुक्त :-**

साहेब, मी एवढीच रिक्वेस्ट केली की, एकच ठेकेदार असेल तर तुम्ही सरासरी करा आणि वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे असेल तर त्यांचे वेगळे करा.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणूनच बोलतो ना. कारण इकडे १५९ रु. आहे. जिकडे डोक्यावरुन वाहतुक जाते मेन रोडला.

**मा. आयुक्त :-**

नाही. मजूरांचे म्हणत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी पहिले मजूरांचे बोलतो. खाली १५६ रु. आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

फक्त ३ रु. चा फरक पडतो ना. १५६ आणि १५९ तीन रुपयाचा फरक पडतो.

**मा. आयुक्त :-**

३ रु. चा फरक पडतो. आणि त्यांना फक्त ८ तासाची ड्युटी आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हा काउंट कमी कसा काय केला? मी ते म्हणतोय.

**मा. आयुक्त :-**

मजूरांचा विषय चर्चेचा नाही. कारण जो ठेकेदार काम करुन घेणार आहे, तो ८ तासच करुन घ्यावे लागणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, नंतर ठेकेदार बाजूला राहतात. अधिकारी पण हात वर करतात. कामे पण होत नाहीत. वाईट अनुभव आम्हाला आजही आहे. गेल्या महिन्यात स्ट्राईक झाली होती. चार दिवस मजूर कामावर आले नव्हते. पगार दिला नाही म्हणून. या सफाईच्या कामाचा आम्ही एक-एक तास मोजतो. आणि या वेळेला १०० टक्के पाउस पडणार आहे असा अंदाज आहे. त्यामुळे तुम्हाला त्याची सगळी तयारी करायला लागणार आहे हे कोणी नाकारुन चालत नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण डम्परची सरासरी करा, एकच ठेकेदार असेल तर. वेगवेगळ्या ठेकेदाराचे असेल तर त्याचे सुध्दा एकच रेट करु. दुसरा असेल त्याचे रेट वेगळे करु. ४५८ रु. हे प्रत्येकाचे करुन चालणार नाही ना. तो म्हणणार माझा दरच नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एकदा रेट कमी केला तर तुम्ही पुन्हा रेट वाढवू शकत नाही ना.

**मा. आयुक्त :-**

नाही.

**प्रविण पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये असे आहे की, आपण काही गट प्रभाग प्रमाणे केले ना.

**मा. आयुक्त :-**

हो.

**प्रविण पाटील :-**

तर काही नाले असे आहेत की, ह्या गटातून त्या गटापर्यंत जातात. मग त्या नाल्याचा कॉन्ट्रॅक्टर वेगळा असेल.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर ते पूर्ण करायचे.

**प्रविण पाटील :-**

इथे ५ नंबर गटाला ४५ नंबर वॉर्ड आहे. त्याला तुम्ही वेगळा कॉन्ट्रॅक्टर ठेवलेला आहे. तिकडे एक नाला आहे का? तो १२ नंबर पर्यंत जातो. आपण ५ नंबरला वेगळा कॉन्ट्रॅक्टर ठेवलेला आहे आणि ४ नंबरला

वेगळा कॉन्ट्रॅक्टर ठेवलेला आहे. पण ४५ वॉर्ड हा ५ नंबरमध्ये आहे. त्याचा एकच नाला १२ नंबर वॉर्डपर्यंत जातो.

**अजित पाटील :-**

काही काही नाले असे आहेत की, २-३ वॉर्डमध्ये जातो.

**प्रविण पाटील :-**

तो कॉन्ट्रॅक्टर तिथे अर्धा नाला साफ करेल आणि नंतर दुसरा कॉन्ट्रॅक्टर साफ करेल का?

**अजित पाटील :-**

ठेका घेतला तसा आपण करुन घेवू या. एक नाला आहे ना तो तीन वॉर्डमध्ये जातो.

**प्रविण पाटील :-**

मग, तिथे तुमचे ३ कॉन्ट्रॅक्टर असतील ना.

**अजित पाटील :-**

त्या एरियामध्ये इन्स्पेक्टर फिक्स आहे. त्याच्यामार्फत आपण करुन घेउ.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. सभापती साहब, बारीश के दिन यह मजूर रहेंगे। तो उनको गमबुट, जॅकेट का क्या है?

**मा. आयुक्त :-**

वह ठेकेदार देखेगा।

**शानु गोहिल :-**

वह लोग देते नही।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. आयुक्त साहब, काम करते है तो देना चाहिए ना।

**मा. आयुक्त :-**

काम करना चाहिए। ऐसी बात है की, २ महिनेके लिए कामगार लेंगे। गमबुट और जॅकेट देंगे। तो उनको क्या बचेगा और १९००-१७०० रु. रेट था वह ९०० रु. रेट हो गया है।

**शानु गोहिल :-**

लेकीन नालेसफाई तो हर साल होता है ना।

**मा. आयुक्त :-**

नाले सफाई हर साल होता है। वही कामगार और वही लोग आते है।ऐसी बात नही है।

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, एक मात्र घ्या की त्याच्यामध्ये जो मेडीकलचा सेट, विटामिन्सचे इन्जेक्शन वगैरे ठेकेदाराने आपल्या ह्याच्यातून द्यावी. कारण आम्ही आमच्याकडून तसे करुन घेतो. आणि दुसरी गोष्ट अशी की, खाड्यांची मोकळे आहे. खाडीच्या बाजूला जी नाल्याची मोकळी जागा आहे तिकडून सुरुवात करायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

तिकडूनच सुरुवात करणार.

**मिलन म्हात्रे :-**

कारण मागच्या वेळेला आमचा पोकलन खाडीत वाहून गेला होता.

**मा. आयुक्त :-**

मुळात जिथून मिळतात, तिथूनच वर यायचे.

**मिलन म्हात्रे :-**

तर ती कामाची पध्दत काय त्याचे तुम्ही आदेश द्या. नाही तर उलट काम सुरु होते.

**मा. आयुक्त :-**

खाडीपासून वर यायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या वर्षी खाडीत पोकलन गेला होता, जे.सी.बी. डूबला होता.

**नगरसचिव :-**

विषयासंदर्भात मा. आयुक्त सो., यांचेकडील गोषवारा वाचन करण्यात आला.

महानगरपालिकेने शहरातील पावसाळी नाले सफाई खोदाई करणेकामी जे.सी.बी. मशीन, पोकलन मशिन, बोटसह पोकलन मशिन भाड्याने घेणे, मजुर व डपंर पुरवठा करणे, सक्शन पंप भाड्याने घणे, आर.सी.सी पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे आदी कामाच्या जाहिर निविदा सुचना दि. ६/४/२००९ रोजी दै. सामना, दै. नवशक्ती, दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदाकाराने निविदा दर सादर केले आहेत. त्यापैकी खालील सर्वात कमी दराच्या निविदा आहेत.

**अ) जे.सी.बी. मशीन, पोकलन मशिन, बोटसह पोकलन मशिन भाड्याने घेणे.**

नाले सफाई कामी जे.सी.बी. मशिन, पोकलन मशिन, बोटीसह पोकलन मशिन पुरवठा कामी **गट क्र. ०१ ते ०८ करीता मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी जे.सी.बी. मशिन रु. ४९५/- प्रती तास, पोकलन मशिन रु. १,१८०/- प्रती तास, बोटीसह पोकलन मशिन रु. १,२२५/- प्रती तास हे दर इतर निविदाकाराच्या तुलने सर्वात कमी आहेत.

**ब) मजुर व डंपर पुरवठा करणे**

कच्चे नाले, पक्के नाल्यातील गाळ काढणे व निघालेला गाळ, माती, कचरा वाहतुक करणे कामी कंत्राटपध्दतीने मजूर व भाड्याने डंपर पुरवठा करणे कामी **गट क्र. ०१, ०२, ०३, ०४** करीता **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५९.३३ व **मे. जय श्री कृष्णा ट्रान्सपोर्ट** यानी प्रती डंपर प्रती दिन रु. ९००/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०५** करीता **मे. संकल्प ट्रेडींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५९.३२ व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानी प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०६** करीता **मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५६/- व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानी प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०७** करीता **मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५६/- व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानी प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०८** करीता **मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५७/- व **मे. जय श्री कृष्णा ट्रान्सपोर्ट** यानी प्रती डंपर प्रती दिन रु. ९००/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**क) सक्शन पंप भाड्याने घेणे व आर.सी.सी. पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे.**

**सक्शन पंप भाड्याने घेणे :-**

शहरात सखल भागात पावसाळी पाणी तुंबून राहु नये म्हणुन पाण्याचा उपसा वेळीच करण्याच्या दृष्टीने (डिवॉटरींग) करणेसाठी पेट्रोल, डिझेल, इंधनावर चालणारे विविध क्षमतेचे आवश्यकतेनुसार सक्शन मशिन ऑपरेटरसह भाड्याने पुरवठा करणे कामी **मे. मनोहर ट्रेडींग कंपनी** यांनी निविदेत सादर केलेले दर सर्वात कमी आहेत.

४) ५ हॉर्स पॉवर - रु. २७५/- प्रती तास
५) १० हॉर्स पॉवर - रु. ३३०/- प्रती तास
६) १५ हॉर्स पॉवर - रु. ३५७/- प्रती तास

**आर.सी.सी. पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे :-**

शहरात पावसाळी पाण्याचा निचरा करणे तसेच नाले खोदताना रोड क्रॉसींग ठिकाणी NP - 3, आर.सी.सी. पाईप टाकावे लागणार आहे. सदर पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे कामाच्या खालील ठेकेदाराच्या निविदा समान असून कमी दराच्या आहेत.

| क्र | निविदाकाराचे नाव | १ फुट व्यास प्रती नग | २ फुट व्यास प्रती नग | ३ फुट व्यास प्रती नग |
|---|---|---|---|---|
| १ | मे. गणेश डेव्हलपर्स | रु. २,६८०/- | रु. ६,२५५/- | रु. ११,०८२/- |
| २ | मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | रु. २,६८०/- | रु. ६,२५५/- | रु. ११,०८२/- |

शहरामध्ये पावसाळ्यात पाणी तुंबु नये, पाण्याचा निचरा व्यवस्थित होण्याच्या दृष्टीने ठिक ठिकाणी रोड क्रॉसिंगमध्ये पाईप बसविणे कामी गरजेनुसार आर.सी.सी. पाईप उपलब्ध करण्यात यावेत. शहरात कोणत्याही विभागात पावसाचे पाणी तुंबणार नाही. कोणताही भाग जलमय होणार नाही. यादृष्टीने आवश्यकती सर्व उपाययोजना करण्यात यावी.

वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या निविदा दरानुसार संबधीत ठेकेदारांची देयके अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे. ठराव वाचुन कायम करण्यात यावा व कामास त्वरीत सुरवात करावी. आवश्यकतेनुसार मजुर, डंपर, मशिनरी वाढविण्यात यावी. तसेच शक्य झाल्यास सक्शन मशिन खरेदी करावी.

**मिलन म्हात्रे :-**

माझी या ठरावात अशी सुचना आहे की, गेल्या वर्षी पण असे पाईप टाकले होते. परत ती साईड तर नाही दाखवली ना, ते परत चेक करुन घ्या. पाईप एकाच ठिकाणी पडतात.

**मा. आयुक्त :-**

या वर्षी पंप आहे. पाईप नाही म्हणतात ना.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव पास झाला ना.

**मा. आयुक्त :-**

ठराव करुन ठेवला. लागणार नाही असा ह्यांचा अंदाज आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही पहिलाच खर्च सांगितलेला आहे. खर्च गेल्या वर्षी प्रमाणे करायचा.

**मिलन म्हात्रे :-**

आता साईड दिलेली नाही. मागच्या वेळेला साईड दिल्या होत्या.

**मा. आयुक्त :-**

गेल्या वर्षी आवश्यकतेनुसार म्हंटल होत. तसे त्या एरियामध्ये आपण टोटल ३३ लाख ९३ हजार ५९१ रु. चे पाईप टाकले.

**मिलन म्हात्रे :-**

साईड चेक करा बाकी काही नाही.

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**प्रकरण क्र. १ :-**

शहरातील पावसाळ्यापूर्वी नालेसफाई कामी लागणारी मशिनरी भाड्याने घेणे व मजूर, डंपर उपलब्ध करणे इ. कामाच्या निविदांना मंजूरी बाबत. प्रकरण क्र. १अ, महापालिका क्षेत्रातील कच्चे पक्के नाले सफाई / खोदाई, गाळ उपसणे कामी जे.सी.बी., पोकलन, बोटीसह मशिन भाड्याने घेणे कामाच्या निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग), प्रकरण क्र. १ब, महापालिका क्षेत्रातील कच्चे / पक्के नाले सफाई कामी ठेका पद्धतीने मजुर पुरवठा व माती गाळ वाहतुक करणे कामी भाड्याने डंपर पुरवठा कामाच्या निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग)) व प्रकरण क्र.१क, महापालिका क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणाऱ्या पाण्याचा उपसा (डिवॅाटरींग) करणे कामी भाड्याने सक्शन मशिन घेणे व आर.सी.सी. पाईप पुरवठा करुन फिक्सींग करणे कामाच्या निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १ :-**

विषयासंदर्भात मा. आयुक्त सो., यांचेकडील गोषवारा वाचन करण्यात आला.

महानगरपालिकेने शहरातील पावसाळी नाले सफाई खोदाई करणेकामी जे.सी.बी. मशीन, पोकलन मशिन, बोटसह पोकलन मशिन भाड्याने घेणे, मजुर व डपंर पुरवठा करणे, सक्शन पंप भाड्याने घणे, आर.सी.सी पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे आदी कामाच्या जाहिर निविदा सुचना दि. ६/४/२००९ रोजी दै. सामना, दै. नवशक्ती, दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवून मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदाकाराने निविदा दर सादर केले आहेत. त्यापैकी खालील सर्वात कमी दराच्या निविदा आहेत.

**<u>अ) जे.सी.बी. मशीन, पोकलन मशिन, बोटसह पोकलन मशिन भाड्याने घेणे.</u>**

नाले सफाई कामी जे.सी.बी. मशिन, पोकलन मशिन, बोटीसह पोकलन मशिन पुरवठा कामी **गट क्र. ०१ ते ०८ करीता मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी जे.सी.बी. मशिन रु. ४९५/- प्रती तास, पोकलन मशिन रु. १,१८०/- प्रती तास, बोटीसह पोकलन मशिन रु. १,२२५/- प्रती तास हे दर इतर निविदाकाराच्या तुलने सर्वात कमी आहेत.

**<u>ब) मजुर व डंपर पुरवठा करणे</u>**

कच्चे नाले, पक्के नाल्यातील गाळ काढणे व निघालेला गाळ, माती, कचरा वाहतुक करणे कामी कंत्राटपध्दतीने मजूर व भाड्याने डंपर पुरवठा करणे कामी **गट क्र. ०१, ०२, ०३, ०४** करीता **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५९.३३ व **मे. जय श्री कृष्णा ट्रान्सपोर्ट** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९००/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०५** करीता **मे. संकल्प ट्रेडींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५९.३२ व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०६** करीता **मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५६/- व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०७** करीता **मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५६/- व **मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९७९/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**गट क्र. ०८** करीता **मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट** यांनी प्रती मजूर प्रती दिन साहित्यासह रु. १५७/- व **मे. जय श्री कृष्णा ट्रान्सपोर्ट** यानीं प्रती डंपर प्रती दिन रु. ९००/- इतर निविदाकाराच्या तुलनेत सर्वात कमी दर सादर केला आहे.

**क) सक्शन पंप भाड्याने घेणे व आर.सी.सी. पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे.**

**सक्शन पंप भाड्याने घेणे :-**

शहरात सखल भागात पावसाळी पाणी तुंबून राहु नये म्हणुन पाण्याचा उपसा वेळीच करण्याच्या दृष्टीने (डिवॉटरींग) करणेसाठी पेट्रोल, डिझेल, इंधनावर चालणारे विविध क्षमतेचे आवश्यकतेनुसार सक्शन मशिन ऑपरेटरसह भाड्याने पुरवठा करणे कामी **मे. मनोहर ट्रेडींग कंपनी** यांनी निविदेत सादर केलेले दर सर्वात कमी आहेत.

७) ५ हॉर्स पॉवर - रु. २७५/- प्रती तास
८) १० हॉर्स पॉवर - रु. ३३०/- प्रती तास
९) १५ हॉर्स पॉवर - रु. ३५७/- प्रती तास

**आर.सी.सी. पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे :-**

शहरात पावसाळी पाण्याचा निचरा करणे तसेच नाले खोदताना रोड क्रॉसींग ठिकाणी NP - 3, आर.सी.सी. पाईप टाकावे लागणार आहे. सदर पाईप पुरवठा करून फिक्सींग करणे कामाच्या खालील ठेकेदाराच्या निविदा समान असून कमी दराच्या आहेत.

| क्र | निविदाकाराचे नाव | १ फुट व्यास प्रती नग | २ फुट व्यास प्रती नग | ३ फुट व्यास प्रती नग |
|---|---|---|---|---|
| १ | मे. गणेश डेव्हलपर्स | रु. २,६८०/- | रु. ६,२५५/- | रु. ११,०८२/- |
| २ | मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | रु. २,६८०/- | रु. ६,२५५/- | रु. ११,०८२/- |

शहरामध्ये पावसाळ्यात पाणी तुंबु नये, पाण्याचा निचरा व्यवस्थित होण्याच्या दृष्टीने ठिक ठिकाणी रोड क्रॉसिंगमध्ये पाईप बसविणे कामी गरजेनुसार आर.सी.सी. पाईप उपलब्ध करण्यात यावेत. शहरात कोणत्याही विभागात पावसाचे पाणी तुंबणार नाही. कोणताही भाग जलमय होणार नाही. यादृष्टीने आवश्यकती सर्व उपाययोजना करण्यात यावी.

वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या निविदा दरानुसार संबधीत ठेकेदारांची देयके अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे. ठराव वाचुन कायम करण्यात यावा व कामास त्वरीत सुरवात करावी. आवश्यकतेनुसार मजुर, डंपर, मशिनरी वाढविण्यात यावी. तसेच शक्य झाल्यास सक्शन मशिन खरेदी करावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रकाश ठाकूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सभा संपल्याची वेळ :- दु. १२.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**